# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## सुधारित परिपत्रक क्र. ५० / २०२२

परिपत्रक क्र. ३७७/२०२१ मध्ये सुधारणा खालीलप्रमाणे.

| मुद्दा क्र. | पुर्वीचे परिपत्रक क्र. ३७७/२०२१ नुसार | नवीन सुधारित परिपत्रकानुसार |
|---|---|---|
| २ | नवीन पाठयक्रम सुरू करणे :— सन २०१९ मधील एकरूप परिनियमातील कलम ३ (१) (एक) नुसार स्वायत्त महाविद्यालयांना शासनाची पूर्व परवानगी न घेता पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचे स्वातंत्र्य असेल. स्वायत्त महाविद्यालयांना श्रेयांक गणनाच्या विद्यापीठाच्या प्रचलित पध्दतीमध्ये फेरफार करता येणार नाही. विद्यार्थ्याला अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेण्यापूर्वी त्या संपूर्ण अभ्यासक्रमातील घटक, अध्यापन पध्दती, मूल्यमापन पध्दतीने कशी आहे, हे जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे सर्व प्रशासकीय सुविधेसाठी स्वायत्त महाविद्यालयांनी संपूर्ण अभ्यासक्रम, पात्रता, अभ्यासक्रमांची उद्दिष्ट, विषयाचे नाव, घटकांचा तपशील, तासिका, श्रेयांक पध्दत, संदर्भ साहित्य, संदर्भ ग्रंथ, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, अंतर्गत मूल्यमापनाचे स्वरूप, सत्र परीक्षेचे स्वरूप, गुणांकन इत्यादी विषयी आणि त्याचबरोबर स्वायत्त महाविद्यालयांच्या नियामक मंडळ, विद्यापरिषद, अभ्यासमंडळ यांच्या अभ्यासक्रम संमत झालेल्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत आणि ठरावाची प्रत विद्यापीठाला सादर करावी. ही माहिती स्वायत्त महाविद्यालयाच्या नियामक मंडळाच्या सभेचे इतिवृत्त पारित केल्यानंतर लगेच किंवा ज्या शैक्षणिक वर्षापासून अभ्याक्रम सुरू करावयाचा आहे त्या लगत पूर्वीच्या दिनांक ०१ मार्च पर्यंत, जे अगोदर घडेल ते विद्यापीठाकडे पाठवावी. हा मसूदा विद्यापीठाच्या संबंधित अभ्यास मंडळाच्या बैठकीत अनुसमर्थनार्थ ठेवण्यात येईल. या मसुद्यात त्रुटी आढळल्यास इमेलद्वारे महाविद्यालयाला कळवून त्यांची एक आठवडयात पूर्तता करून घेण्यात येईल. अभ्यासक्रमाचा मसुदा परिपूर्ण असल्यास तसे स्वायत्त महाविद्यालयास इमेलद्वारे कळविण्यात येईल. अभ्यासक्रमाचा परिपूर्ण मसुदा प्राप्त झाल्यावर संलग्नता विभागाकडून संबंधित अभ्यासक्रमास संलग्नता प्रदान करण्यात येईल. | नवीन अभ्यासक्रमाचा मसुदा दि. ३१ मार्च पर्यंत विद्यापीठाकडे पाठवावा व हा मसुदा संबंधित महाविद्यालय/परिसंस्था यांनी अभ्यासमंडळाच्या माहिती करिता अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांकडे पाठविला जाईल. सदर मसुद्यात काही त्रुटी असल्यास सदरचा मसुदा पाठविल्यानंतर १५ दिवसात संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेस कळविण्यात येईल व त्याबाबतची पूर्तता सदर महाविद्यालय/परिसंस्थेने पुढील एका आठवडयात करावी. अभ्यासक्रमाचा मसुदा परिपूर्ण असल्याचे संबंधित अभ्यासमंडळाचे अध्यक्ष प्रमाणित (Certify) करतील. परिपूर्ण अभ्यासक्रम मान्य केल्याचे विद्यापीठाच्या संलग्नता विभागाकडून संबंधित महाविद्यालयास कळविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | दिनांक ०१ मार्च नंतर किंवा अपूर्ण माहिती पाठविल्यास स्वायत्त महाविद्यालयाला पुढील शैक्षणिक वर्षात अभ्याक्रम सुरू करता येणार नाही. | |
| ३ | सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र.३ मधील स्वायत्त महाविद्यालयाला विद्यमान अभ्यासक्रमाची पुनर्रचना करता येईल. त्या पुनर्रचित अभ्यासक्रमाचा संपूर्ण तपशील विद्यापीठाला ज्या शैक्षणिक वर्षापासून सदर अभ्यासक्रम लागू करावयाचा आहे त्या लगत पूर्वीच्या दिनांक ०१ मार्च पर्यंत सादर करणे अनिवार्य असेल. | सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र.३ मधील स्वायत्त महाविद्यालय/परिसंस्थेस विद्यमान अभ्यासक्रमाची पुनर्रचना करता येईल. त्या पुनर्रचित अभ्यासक्रमाचा संपूर्ण तपशील विद्यापीठाला ज्या शैक्षणिक वर्षापासून सदर अभ्यासक्रम लागू करावयाचा आहे त्या लगत पूर्वीच्या दिनांक ३१ मार्च पर्यंत सादर करणे अनिवार्य असेल. |
| १३ | स्वायत्त महाविद्यालयाने एकाच वेळी दोन पेक्षा अधिक अभ्यासक्रम/तुकडया सुरू करू नयेत. | स्वायत्त महाविद्यालय/परिसंस्थेने एकाच वेळी एका विद्याशाखेत दोन पेक्षा अधिक अभ्यासक्रम /तुकडया सुरू करू नयेत. |

(डॉ प्रफुल्ल पवार )
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे—४११००७ )
जावक क्र. स्वीउ/१९५ )
दिनांक.१८ फेब्रुवारी, २०२२ )

प्रत :

१. मा.प्राचार्य/संचालक, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
२. मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश आणि पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
४. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष ) प्रस्तुत विद्यापीठ
५. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष) प्रस्तुत विद्यापीठ
६. सहा.कुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ